[Text not legible]

25 JUL 20__

To,
Chairman/Secretary,
**Tilak Maharashtra Vidyapeeth, Nyas Vidyapeeth Bhavan, Gultekadi, Mukundnagar, Pune**

**Subject** : In respect of establishing new schools from the academic year 2016-17 on self finance basis under the Maharashtra Self-Financed School (Establishment and Regulation) Act, 2012 and to grant permission to enhance standard of the existing schools.

**Reference** : 1) Maharashtra Self - Financed School (Establishment and Regulation) Act (Government of Maharashtra Gazette Extraordinary No. 1,6 and 24), 2012.
2) Government Resolution NHP-2009/(663/09)/Mashi-1 Date 20th June, 2012.
3) Government Resolution SFS-1016/P.K.69/SM-2 School Education and Sports Department, Mantralaya, Mumbai-3 Dt. 17.06.2016.

It is hereby informed to you about captioned subject that, your society has filed a proposal for establishing new school/for enhancing standard of the existing schools from the academic year 2016-17 under the Maharashtra Self - Financed School (Establishment and Regulation) Act, 2012. As per the said proposal and in accordance with the government resolution at Reference No. 03 above, **a permission is hereby given to your society to establish new school/enhance standard of existing school on following terms and conditions.**

| Govt. List Sr. No. | District | Name of the applicant society | Name and address of the recognized school | Medium | Type of school new school/ enhancement of standard and affiliated board | Recognized class/ standards | Year of recognition |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 924 | Pune | Tilak Maharashtra Vidyapeeth Pune Nyas Vidyapeeth Bhavan, Mukundnagar, Gultekadi, Pune | Tilak Maharashtra Vidyalaya Mukundnagar, Gultekadi, Pune | English | New School (C.B.S.E.) | Primary (Std. 1st to 5th) | 2016-17 |

**Terms and conditions :-**

1. The school shall comply with all provisions of Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and Rules framed or to be framed there-under.
2. A permission (Letter of Intent) to start school from the academic year 2016-17 to the management of the school which is found eligible upon compliance of provisions of Act, 2009.
3. The management, complying with all issues required under the rules prescribed by the government for establishing schools, shall, within one month from commencement of academic year, apply to the Education Office of the concerned district for first recognition.
4. If the management, found eligible vide this government resolution for the year 2016-17, does not comply with all issues required under the rules prescribed by the government for establishing schools then, it is mandatory to comply with such issues and start school within eighteen months from the date of said government resolution, otherwise the permission hereby given will stand cancelled automatically.
5. For the institutions, to which the Government had declared as eligible and granted permission, it is necessary for its Management/Educational Institutions, who are willing to get affiliated with the syllabus of the Educational Boards like CBSE, ICSE, IB, IGCSE and CIE etc., to obtain First School Recognition for obtaining N.O.C. as per the overall policies prescribed under the Government Resolution dated 20th June, 2012. Upon obtaining such recognition from the District Education Officer (Primary)/District Education Officer (Secondary) / Education Inspector, under Clause (10) of the said Government Resolution, the Institution shall file an application alongwith the Recognition Letter to the Government seeking Affiliation No Objection Certificate (NOC) for getting affiliated with the concerned Board. Upon conducting scrutiny of such application, if it is found that, the concerned school is complying with the prescribed criteria, terms and conditions, the Government will issue No Objection Certificate (NOC) for affiliation to the concerned Board to the said school.
6. It is mandatory for the new schools/upgraded schools, to whom permission is given, to follow the orders and procedure issued by the government from time to time and the provisions of the Maharashtra Self-Financed School (Establishment and Regulation) Main Act, 2012 (01 of Year 2013).
7. The concerned competent officer shall confirm that provisions of Act, 2009 are complied with and thereafter he may take initiative for granting first recognition.
8. Any change in future in the medium, place of school etc. to which permission for school as sought by the trust is not allowed. The permission issued by the government may deemed as cancelled, if the school is started at a place other than the place to which government has given its permission to start the said school.
9. The concerned trust will be responsible for obtaining U-DISE number by enrolling the same in separate category being "recognized school on self-financed basis" while filing information in the U-DISE (Unified District Information System for Education) in respect of new schools/up gradation of schools permitted under the said Government Resolution. The State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai is declared as 'Nodal Officer' for taking further actions in this regard. Similarly, the trust also required to display the board on the gate and outside of school revealing text viz. "Self-finance based New School/Upgraded Class permitted school" for the sake of information of all concerned.

Sd/-
**(Dinkar Temkar)**
**Dy. Director of Education**
**Pune Division, Pune-1**

**Copy for information and action,**
[Text not legible]


**Translated by**
**Mr. Rajesh Sidram Dasa**
**A Panel Translator of Govt. of Maharashtra**
Appointed at Sr. No. 6 of the Panel constituted by the Government of Maharashtra vide a GR No. Namika-2019/Pra.Kra.29/Bhasha-2 Dated 22nd March, 2021.
Language Pair – Marathi ⇆ English
**As per GR, seal not allowed. Signature suffices.**

**TRUE TRANSLATION**

**MR. RAJESH SIDRAM DASA**
**R/at : Flat No. 501, Paramount Gardens, Katraj-Kondhwa Road, Gokulnagar, Katraj, Pune – 411046.**
**Mobile No. :** 9850814652 **Email :** rajeshdasa.08@gmail.com

प्रति

अध्यक्ष/सचिव,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ न्यासविद्यापीठ भवन गुलटेकडी, मुकुंदनगर, पुणे-४११०३७

27 JUL 2016

**विषय** - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**

**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६२/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**

**३. शासन निर्णय एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. १७.०६.२०१६.**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९२४ | पुणे | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ न्यासविद्यापीठ भवन गुलटेकडी, मुकुंदनगर, पुणे-४११०३७ | टिळक महाराष्ट्र विद्यालय, विद्यापीठ भवन, गुलटेकडी, मुकुंदनगर, पुणे-४११०३७ | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी ) | २०१६-१७ |

**अटी व शर्ती :-**

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**